## दाव्या सोबतचे शपथपत्र

Exh-5/D

## मे.दिवाणी न्यायाधिश साहेब, क.स्तर,अंबाजोगाई यांचे न्यायालयात

रे.दि.दावा नं.706 /२०२५.

**वादी** :- महादेव पिता श्रीराम कदम वय ५५ वर्ष धंदा नौकरी व शेती, रा.चनई ता.अंबाजोगाई जि.बीड.

**विरुध्द**

**प्रतिवादी** :- १) सदाशिव पिता श्रीराम कदम वय ४९ वर्ष धंदा शेती, रा.चनई ता.अंबाजोगाई जि.बीड.

२) ज्ञानोबा पिता श्रीराम कदम वय ४७ वर्ष धंदा नौकरी व शेती, रा.चनई ता.अंबाजोगाई जि.बीड.

३) हनुमंत पिता श्रीरामकदम वय ४१ वर्ष धंदा नौकरी, रा.सदर.

४) संगीता भ्र.तुकाराम कदम वय ३७ वर्ष धंदा व रा.सदर.

५) शंभुराजे पिता तुकाराम कदम वय १५ वर्ष धंदा शिक्षण, अ.पा.क.आई प्रतिवादी क्र.४ संगीता भ्र.तुकाराम कदम रा.सदर.

order-Dt. 14/11/2025
Filed

Digitally signed by SAGADE PRAVIN PRABHAKAR
Date: 2025.11.15 10:45:59 +0530

Jt. C.J.J.D.Ambajogai

६) शुभ्रा पितातुकाराम कदम वय १२ वर्ष धंदा शिक्षण, अ.पा.क.आई प्रतिवादी क्र.४ संगीता भ्र.तुकाराम कदम रा.सदर.

**दावा** :- सरस निरस मानाने वाटणी करुन स्वतंत्र ताबा मिळणे बाबत.

## —: श प थ प त्र :—

मी, महादेव पिता श्रीराम कदम वय ५५ वर्ष धंदा नौकरी व

पान नं.२ वर ....

शेती, रा.चनई ता.अंबाजोगाई जि.बीड, प्रतिज्ञेवर सत्य निवेदन करतो की,मी आणि प्रतिवादी क्र.१ ते ६ हे मौजे चनई ता.अंबाजोगाई जि.बीड येथील रहीवाशी असुन प्रतिवादी क्र.१ ते ३ माझे सख्खे भाऊ असुन प्रतिवादी क्र.४ ही माझा आणि प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचा मयत भाऊ तुकाराम पिता श्रीराम कदम यांची पत्नी म्हणजेच माझी भावजयी असुन प्रतिवादी क्र.५ व ६ ही प्रतिवादी क्र.४ ची मुले म्हणजेच माझे आणि प्रतिवादी क्र.१ ते ३ चे पुतणे आहेत.

मी आणि प्रतिवादी क्र.१ ते ६ हिंदु एकत्र कुटूंबाचे घटक आहोत. माझ्या आणि प्रतिवादी क्र.१ ते ६ यांच्या हिंदु एकत्र कुटूंबाच्या शेत जमीनी मौजे चनई ता.अंबाजोगाई जि.बीड येथे खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | गट नंबर | क्षेत्रफळ हे.आर | आकार रु.पैसे | कोणाचे नांवे |
|---|---|---|---|---|
| १) | ११४ | ०.१४ | ०-४६ | प्रतिवादी क्र.१ चे नांवे |
| २) | ११४ | ०.१४ | ०-४६ | प्रतिवादी क्र.३ चे नांवे |
| ३) | ११४ | ०.१४ | ०-४६ | प्रतिवादी क्र.४ ते ६ चे नांवे |
| ४) | १६० | ०.४२ | १-३१ | प्रतिवादी क्र.१ चे नांवे |
| ५) | १६० | ०.४२ | १-३१ | प्रतिवादी क्र.३ चे नांवे |
| ६) | १६० | ०.४२ | १-३१ | प्रतिवादी क्र.४ ते ६ चे नांवे |
| | **एकुण :** | **१.६८** | **५-३१** | |

वरिल मिळक्तीस प्रस्तुत दाव्यात यापुढे "वादग्रस्त मिळकत" म्हणुन संबोधण्यात आलेले आहे.

पान नं.३ वर ...

वादग्रस्त मिळकतीची माझ्या मध्ये आणि प्रतिवादी क्र.१ ते ६ यांचे मध्ये आपसात यापुर्वी कधीही कसल्याही प्रकारे वाटण्या झालेल्या नाहीत. केवळ कुटूंबाच्या सोयी करीता प्रतिवादी क्र.१ व ३ आणि माझा आणि प्रतिवादी क्र.१ ते ३ चा भाऊ म्हणजेच प्रतिवादी क्र.४ चे पती आणि प्रतिवादी क्र.५ व ६ चे वडील नामे तुकाराम पिता श्रीराम कदम या तिघांच्या नांवे समान करण्यात आल्या होत्या. पुढे तुकाराम पिता श्रीराम कदम हा मयत झाल्यानंतर वारसा अधारे तुकाराम पिता श्रीराम कदम यांचे नांवे असलेल्या मिळकतीस वारसा अधारे प्रतिवादी क्र.४ ते ६ च्या नांवे वारसाचा फेर घेण्यात आलेला आहे. वास्तविक पहाता प्रतिवादी क्र.१ व ३ आणि प्रतिवादी क्र.४ ते ६ यांच्या नांवे असलेल्या वरिल वादग्रस्त मिळकती मध्ये माझा आणि प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचा प्रत्येकी १/५ आणि प्रतिवादी क्र.४ ते ६ यांचा एकुण १/५ हिस्सा आहे. मात्र सदर वादग्रस्त मिळकतीची मी आणि प्रतिवादी क्र.१ ते ६ हे हिंदु एकत्र कुटूंबाचे घटक या नात्याने वरिल पुर्ण वादग्रस्त मिळकतीची वहिती करुन उपभोग घेत आलेलो आहोत.

वागद्रस्त मिळकती मध्ये माझा कायदेशिर १/५ हिस्सा असतांना केवळ वादग्रस्त मिळकत ही माझ्या नांवे नसल्यामुळे मला शासनाच्या योजनांच्या लाभापासुन वंचीत रहावे लागत आहे, याकरीता मी दिनांक २५/१०/२०२५ रोजी यातील प्रतिवादी क्र.१ ते ६ यांना वादग्रस्त मिळकतीची सरस निरस मानाने वाटणी करुन त्यातील माझ्या कायदेशिर १/५ हिस्याचे क्षेत्र वेगळे काढुन ते माझ्या स्वतंत्र ताब्यात देण्याची विनंती केली असता, प्रतिवादींनी त्यास स्पष्ट नकार दिला. करीता मला प्रतिवादींच्या विरुध्द -

पान नं.४ वर ....

मा.न्यायालयात प्रस्तुतचा दावा दाखल करणे भाग पडले असुन दाव्याचा जवाब देण्याची जवाबदारी प्रतिवादींवर आहे. दावा हक्क प्राप्तीची तारीख २५/१०/२०२५ ईसवी ही आहे.

माझा दावा खरा व बरोबर आहे, करीता माझा दावा मी दाव्यात केलेल्या मागणी प्रमाणे डिक्री करण्यात येवनु मौजे चनई ता.अंबाजोगाई जि.बीड येथील दाव्याचे परिच्छेद क्र.२ मध्ये दर्शविलेल्या वादग्रस्त मिळकतीची सरस निरस मानाने वाटणी करुन त्यातील माझ्या कायदेशिर १/५ हिस्याचे क्षेत्र वेगळे काढुन ते माझ्या ताब्यात स्वतंत्र मालक म्हणुन देण्यात यावे.

तसेच मला प्रतिवादींकडुन प्रस्तुत दाव्याचा खर्च देवविण्यात यावा.

तसेच मी अन्य ज्या मागणीचा कायद्यान्वये हक्कदार ठरतो ती माझ्या हक्कात मंजूर केली जावी.

सबब हे शपथपत्र दिले ते खरे आहे.फ.

दिनांकः १७/११/२०२५.

**प्रतिज्ञक,**

महादेव पिता श्रीराम कदम,

रा.चनई ता.अंबाजोगाई जि.बीड.

प्रतिज्ञेवर सत्य निवेदन करतो की, प्रस्तुतच्या शपथपत्रा मधील संपुर्ण मजकुर माझ्या माहिती आणि समजुती प्रमाणे खरा व बरोबर आहे, करीता यावर मी आज माझ्या समजुन उमजुन स्वाक्षऱ्या केल्या आहेत, त्या खऱ्या आहेत.फ.

दिनांकः११ /११/२०२५.

**प्रतिज्ञक,**

महादेव पिता श्रीराम कदम,

रा.चनई ता.अंबाजोगाई जि.बीड.

**मी प्रतिज्ञकास ओळखतो.**

**ॲड.पी.जी.शिंदे,**

**अंबाजोगाई**

11 NOV 2025

**AFFIDAVIT**

Solemnly affirmed before me

by Shri / Smt. Mahadev S/o Shriram Kadam

Age 55 Yrs. Occ. Service R/o. Chanai

Tq. Ambajogai Dis. Beed

Who Identified by Adv. P.G.Shinde

Whom He / She Is Personally Known

Adv. Prashant Gopinath Shinde

Advocate & Notary Govt. of India

Ambajogai Dist. Beed

NOTARY
ADV. PRASHANT GOPINATH SHINDE
AMBAJOGAI BEED
MAHARASHTRA
Regn. No. 45091
Exp.Dt. 03/03/2030
GOVT. OF INDIA

NOTARY
ADVOCATE
Prashant G.Shinde
Ambajogai Dist. Beed
Reg. No. 45091
GOVERNMENT OF INDIA